# रे.दि.मु.नं.५२/२०१६ मधील नि.९६ वरील आदेश
## (वसंतराव भोसले वगैरे वि. व्यंकटराव चव्हाण वगैरे)
## CNR No-MHST05-000660-2016

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी नि.८७ चे कोर्ट कमिशनचे अर्जावरील दि. २१.०८.२०२५ रोजीचे आदेशामध्ये दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील थोडक्यात कथन असे की –** वादीने सदरचा दावा हा दावा मिळकतीमधील गणपती मंदिर याची देखभाल करणे, वस्तु, देणग्या स्वीकारणेचा अधिकार आहे असे जाहीर ठरवून प्रतिवादींनी त्यास हरकत करु नये म्हणून निरंतर ताकीद मागणेसाठी दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी नि.८७ ला दि.२६.०२.२०१९ रोजी कोर्ट कमिशनर म्हणून निमताना मोजणीदार यांची नेमणूक करण्याबाबतचा अर्ज दिला होता. त्यामध्ये कोळेवाडी येथील जुना सर्वे नं.५५/२अ/१/१ याचा जुना सर्वे नं.६० यामधील ग्रामपंचायत मिळकत नंबर ८४० मध्ये नमुद केल्याप्रमाणे या सर्वे नंबरमध्ये गणपती मंदीर असून त्यासमोर सभामंडप आहे. त्या मिळकतीमध्येच गणपती मंदिर बांधलेले आहे. प्रतिवादींनी नि.३६ ला सविस्तर कैफीयत दिलेली आहे व त्या कैफीयतीमध्ये मौजे कोळे येथील जुना सर्वे नं.१४१ त्याचा १९७० साली झालेल्या गट नं.९०४ चा झालेला नवीन गट नं.६७७/१ ही मिळकत प्रतिवादी यांची वडीलार्जित मालकी वहिवाटीची असून या मिळकतीमध्येच गणेश मंदिर व सभामंडप आहे. केवळ प्रतिवादीच्या गट नंबरला लागून पश्चिम बाजूस सर्वे नं.५५/२अ/१/१ ही मिळकत असल्याचा वादींनी गैरफायदा घेवून नसलेला हक्क प्रस्थापित करण्यासाठी सदरचा दावा केलेला आहे.

४. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ याने जुना सर्वे नं.१४१ याचा गट नं.६७७/१ या मिळकतीची दि. २७.०९.२०११ रोजी सरकारी मोजणी करुन घेतली होती. दि.१४.१०.२०११ रोजी मोजणी करुन घेतली व त्याप्रमाणे

प्रतिवादी यांना नकाशा देवून त्यामध्ये गणपती मंदिराचा समावेश हा कोळे हद्दीत दर्शविला होता. त्यानंतर प्रतिवादी यांनी सदर गट नंबरची मोजणी दि.२०.०४.२०१८ रोजी करुन घेवून त्यामध्ये गणपती मंदिर हे कोळेवाडी गावचे हद्दीतील जुना सर्वे नं.६० व याचा नवीन नं.५५/२अ/१/१ मध्ये असल्याचे दर्शविले होते. त्यामुळे भूमि अभिलेख, कराड यांचे कार्यालयातील दोन्ही मोजणीमध्ये गणपती मंदिराबाबत तफावत निर्माण झाली होती म्हणून नि.८७ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर दि.२१.०८.२०२५ रोजी आदेश होवून अर्ज मंजूर करण्यात आला होता. सदर आदेशाची अंमलबजावणी होणेसाठी मा. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख सातारा यांना विनंती अर्ज दि.११.०९.२०२५ रोजी दिला होता. सदर कार्यालयाने दि.२३.०१.२०२६ रोजी लेखी पत्र प्रतिवादींना देवून त्यामध्ये निमताना मोजणीसाठी मा. उपअधिक्षक, तालुका भूमि अभिलेख यांचेमार्फत मोजणी करुन घेणेसाठी मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशामध्ये दुरुस्ती होवून मिळावी असे कळविले होते. त्यामुळे प्रतिवादींनी त्या अनुषंगाने दि.२१.०८.२०२५ रोजीचे आदेशामध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

५. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द दि.३०.०४.२०२६ रोजी विना म्हणणे आदेश पारीत झालेला आहे.

६. अर्जाचे अवलोकन केले. प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला.

७. सदर प्रकरणामध्ये दोन कमिशन रिपोर्ट दाखल झाले आहेत. वादी व प्रतिवादी यांनी मोजणी करुन घेतलेली आहे. परंतु प्रतिवादींच्या कथनानुसार दोन्ही कमिशन रिपोर्ट एकमेकांशी विसंगत आहेत. त्यामुळे वादातील गणेश मंदीर व सभामंडप हे नेमके कोणाच्या हद्दीत आहे ही बाब निमताना मोजणीदार यांचेकडून मोजणी करुन घेतलेस योग्य कमिशन रिपोर्ट अभिलेखावर येणार आहे. ज्यामुळे दावा गुणदोषावर निकाली होणेस मदतच होणार आहे. यासाठी प्रतिवादींनी नि.८७ येथे कमिशनचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर दि.२१.०८.२०२५ रोजी आदेश होवून सदरचा अर्ज मंजूर करणेत आला होता. त्यानुसार प्रतिवादींनी जिल्हा भूमि अभिलेख, सातारा यांना

अर्ज करुन अंमलबजावणी होणेकामी विनंती केली असता सदर कार्यालयाने जा.क्र.७८/२०२६ चे पत्रान्वये उपअधिक्षक, तालुका भुमि अभिलेख, कराड यांचेकडून मोजणी होणेबाबत कळविले आहे. म्हणून प्रतिवादींनी नि.८७ चे अर्जावरील आदेशामध्ये दुरुस्ती होणेकामी विनंती केली आहे.

८. वादातील गणेश मंदीर व सभामंडप नेमके कोणाच्या हद्दीत आहे ही बाब योग्यरित्या अभिलेखावर येण्याकरीता मोजणी होणे गरजेचे आहे. मोजणी झालेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा गुण दोषावर निकाली होणेस मदतच होणार आहे. मोजणी झालेस वादी प्रतिवादी यांचेतील वाद कायमपणे संपूष्टात येणार आहे. प्रतिवादींचे सदर अर्जातील विनंतीवरुन उपअधिक्षक, तालुका भुमि अभिलेख, कराड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करणेत येत आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक, तालुका भूमि अभिलेख, कराड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. कोर्ट कमिशनर यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी मौजे कोळेवाडी हद्दीतील वादी यांचा जुना सर्वे क्र.५५/२अ/१/१ याचा जुना सर्वे नं.६० मधील ग्रामपंचायत मिळकत नंबर ८४० व प्रतिवादी यांचा मौजे कोळे हद्दीतील जुना सर्वे क्र.१४१ त्याचा गट नं.९०४ चा नवीन गट नं.६७७/१ या गटांची मोजणी करुन वादातील गणेश मंदीर व सभामंडप हे नेमके कोणाच्या हद्दीत येते हे मोजमापासह नकाशात दर्शवून त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक मोजणी नकाशा तयार करुन त्याचा अहवाल एक महिन्याच्या आत न्यायालयात दाखल करावा.

४. सदर कोर्ट कमिशनर यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी दोन्ही

पक्षांना, त्यांचे वकिलांना त्यांच्या भेटीबाबत, तपासणीबाबत, दावा मिळकतीवर जाण्याबाबत व त्याच्या तारखेबाबत मोजणीपुर्व नोटीसा दयाव्यात.

५. प्रतिवादी यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर कोर्ट कमिशनर यांची फी उपअधिक्षक, तालुका भूमि अभिलेख, कराड यांच्या कार्यालयात नियमानुसार जमा करुन तशी पुर्तता करावी व आवश्यक ते कागदपत्र व इतर आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन या न्यायालयास कळवावे.

६. कोर्ट कमिशनर यांना पत्र पाठवून प्रत्यक्षरित्या सदर हुकूमाबाबत कळविण्यात यावे.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.04.30 17:14:16 +0530

कराड (जे.जे.माने)
दिनांक ३०/०४/२०२६ ४ थे सह. दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड